# मेट्रो-३ चे बांधकाम ऑक्टोबरपासून

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. २४ : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ च्या भुयारी बांधकामाला ऑक्टोबरपासून सुरुवात होईल, असे मुंबई मेट्रो रेल महामंडळाने (एमएमआरसी) बुधवारी जाहीर केले. मेट्रो मार्गाच्या बांधकामाचे कंत्राट मिळालेल्या चार कंपन्यांबरोबर करार झाल्यानंतर ही घोषणा करण्यात आली.

३३.५ किलोमीटर लांबीच्या या मेट्रो मार्गाच्या बांधणीसाठी एमएमआरसीने पाच कंपन्यांना सात पॅकेजमध्ये तब्बल १८ हजार ११४ कोटी ९ लाखांचे कंत्राट दिले आहे. त्यातील चार कंपन्यांबरोबर एमएमआरसीचा करार बुधवारी झाला. उर्वरित एका कंपनीबरोर नंतर करार केला जाईल. मेट्रो-३ हा मार्ग मुंबईच्या उत्तर व दक्षिण टोकाला जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. नरिमन पॉइंट, बीकेसी ही महत्त्वाची व्यापारी केंद्रे, विमानतळ, एमआयडीसी व सीप्झसारखे औद्योगिक परिसर यामुळे जोडले जातील. याशिवाय, उपनगरी रेल्वेद्वारे न जोडला गेलेला काळबादेवी, वरळी, प्रभादेवी व अंधेरी पूर्व परिसर जोडला जाणार आहे.

'करारावर स्वाक्षऱ्या झाल्याने आता कंत्राटदार कामाला सुरुवात करू शकतील. सध्या सर्वेक्षण, विविध चाचण्या ही कामे प्रगतिपथावर आहेत. पावसाळ्यानंतर लगेच काम सुरू होईल. प्रत्यक्ष बांधकामाला ऑक्टोबर २०१६ मध्ये सुरुवात होणे अपेक्षित आहे' असे व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी सांगितले.